# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ४७ वा शुक्रवार दि.१९ जुलैं २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | L&T SWITCHGEAR | INDOASIAN | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## मनोज जरांगेंचे उपोषण; राजेंद्र पाटलांची शिष्टाई



जालना : सरकार आणि मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांच्यात मध्यस्थी करत असलेले बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी गुरूवारी दुपारी अंतरवालीत दाखल झाले. आ. राऊत आणि मनोज जरांगे यांच्यात चर्चा झाली. यावेळी तुम्ही पुन्हा उपोषणाला बसू नये, अशी राज्य सरकारची भूमिका असल्याचा निरोप आमदार राजेंद्र राऊत यांनी मनोज जरांगे यांना दिला.

बुधवारी मनोज जरांगे यांनी आमदार राजेंद्र राऊत यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर आज आ. राऊत यांनी जरांगेंची भेट घेतली. जरांगे यांचा माझ्या बाबत गैरसमज झालेला आहे. माझ्या पोटात इन्फेक्शन झाल्याने मी भेटीला आलो नाही. तसेच सभागृहात पण अधिवेशनावेळी मी एकच दिवस गेलो असे म्हणत राऊत यांनी जरांगे यांच्या टीकेवर स्पष्टीकरण दिले आहे. दरम्यान, आमदार राजेंद्र राऊत आणि जरांगे पाटील यांच्यात चर्चा झाली. यावेळी आ. राऊत यांनी फोनवरून मंत्री शंभूराज देसाई यांच्यासोबत संपर्क साधला. मात्र, जरांगे आणि शंभूराज देसाई यांची चर्चा होऊ शकली नाही. सरकारने किंवा सरकारच्या प्रतिनिधींनी छत्रपती संभाजीनगरमध्ये येऊन चर्चा करावी अशी मनोज जरांगे यांची इच्छा आहे. मात्र उद्या साता-यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवकालीन वाघनखं येणार असल्याने शंभूराज देसाई व्यस्त आहेत. शनिवारी मनोज जरांगे पाटील हे उपोषणाला बसणार आहेत. त्यामुळे चर्चेला वेळ लागत आहे असे आमदार राजेंद्र राऊत म्हणाले. उद्या मुख्यमंत्र्यांची भेट घेणार मनोज जरांगे यांच्याशी चर्चा झाली आहे. मी उद्या मुख्यमंत्री एकनाथ शदिं आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त फकिरा ब्रिगेडच्या वतीने अभिवादन




लातूर (प्रतिनिधी) साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दिनांक १८जुलै २०२४ रोजी फकिरा ब्रिगेड या संघटनेच्या वतीने गंजगोलाई येथील अण्णाभाऊं साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी फकिरा ब्रिगेडचे केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर यांनी अण्णा भाऊंच्या जीवन ,कार्यावर प्रकाश टाकला ते म्हणाले की,दिड दिवस शाळेत जाऊन ३२ कादंब-या, तेरा कथासंग्रह, चौदा लोकनाट्य, एक नाटक, पंधरा पोवाडे,शाहिरी, माझा रसियाचा प्रवास हे प्रवास वर्णन इतक्या साहित्य प्रकारांमध्ये अण्णाभाऊंनी लेखन करून जगात प्रसिद्धी मिळवली, मराठी भाषा एकलव्या प्रमाणे आत्मसात केली आणि महाराष्ट्र शारदेच्या दरबारात अमूल्य असे साहित्य सादर केले.या प्रसंगी संजय विरूळे, संतोष पटनुरे, सुदर्शन शिंदे, सुभाष गायकवाड, उर्मिला नवगिरे, पांडुरंग मस्के इ.कार्यकर्ते उपस्थित होते

## १०० आणा, सरकार बनवा!



लखनौ : वृत्तसंस्था उत्तरप्रदेश भाजपमधील सुंदोपसुंदीच्या पार्श्वभूमीवर सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी भाजपमधील असंतुष्टांना थेट मान्सून ऑफर घोषित केली. '१०० आणा, सरकार बनवा' असे थेट आवाहनच त्यांनी केले आहे. उत्तर प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर भाजपमधील अंतर्गत संघर्ष विकोपाला गेला आहे. तसेच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य हे आमने सामने आल्याचे दिसत आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते आणि पदाधिका-यांच्या लखनौपासून दिल्लीपर्यंत बैठकांवर बैठका होत आहेत. वेगवेगळे दावे केले जात आहेत. त्या पार्श्वभूमीवर भाजपमधील या वादाचा फायदा घेण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी सुरू केला आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही भाजपमधील या सत्तासंघर्षादरम्यान आपली चाल खेळत या असंतुष्टांना मान्सून ऑफर दिली आहे. '१०० घेऊन या आणि सरकार बनवा', अशी ऑफर त्यांनी दिली आहे. '१०० आणा आणि सरकार बनवा' म्हणजेच १०० आमदारांना सोबत घेऊन या आणि समाजवादी पक्षासोबत उत्तर प्रदेशात सरकार बनवा, असे सूचक आवाहन या माध्यमातून अखिलेख यादव यांनी भाजपमधील असंतुष्टांना केले. अखिलेश यादव यांनी ही ऑफर भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांना उद्देशून दिल्याचं बोललं जात आहे. योगी आदित्यनाथ आणि केशव प्रसाद मौर्य यांच्यामध्ये मागच्या काही दिवसांपासून मतभेद उफाळून आले आहेत. त्या पार्श्वभूमीवर अखिलेश यादव यांनी या वादावर खोचक टिप्पणी करत दिलेली ही ऑफर उत्तर प्रदेशच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर उत्तर प्रदेशमधील भाजपामध्ये सारं काही आलबेल नसल्याचे संकेत मिळत होते.

## राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी धनंजय मुंडे



पुणे : सध्या कॅबिनेट मंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांच्यावर आता नवीन आणि महत्त्वाची जबाबदारी देण्यात येत असल्याची त्यांनी घोषणा केली. या पत्रकार परिषदेत राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या मान्यतेने राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची निवड केल्याचे तटकरे यांनी सांगितले. त्यासोबतच प्रदेश प्रवक्तेपदी नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर यांची निवड केल्याचीही घोषणा प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी केली.

राज्यात भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादीचे महायुती सरकार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला ४ पैकी केवळ १ जागा जिंकता आली. पण विधानपरिषदेच्या निवडणुकीत त्यांनी ते अपयश धुवून टाकले. राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे असे दोनही उमेदवार निवडून आणले. आता सर्वच पक्ष विधानसभेच्या निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. लोकसभेच्या पराभवानंतर लवकरच अजित पवार बारामतीत जाणार आहेत. त्याआधी आज अजितदादांच्या टीममधील खास नेते असलेले कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पक्षातील एक महत्त्वाची नवीन जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी आज एक पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी काही महत्त्वाची माहिती दिली. पुढे तटकरे म्हणाले, सोमवार दिनांक २२ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अहिल्यानगर दौरा निश्चित करण्यात आला असून या दौ-यात महिलांशी थेट संवाद साधणार असल्याचा उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केला आहे. सकाळी पारनेर, दुपारी अहिल्यानगर शहर, श्रीगोंदा आणि संध्याकाळी कर्जत जामखेड याठिकाणी अजित पवार महिलांच्या समस्या, अडचणी समजून घेणार आहेतच शिवाय लाडकी बहिण योजना, तीन सिलिंडर मोफत, विद्यार्थिनींना मोफत शिक्षण याबाबतही माहिती देऊन त्यांचे याबाबत मत जाणून घेऊन सरकारच्या माध्यमातून त्याचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

६४ वर्षाच्या महाराष्ट्राच्या या राजकीय आणि सामाजिक प्रवासात शिव-शाहू-फुले- आंबेडकरांच्या या महाराष्ट्राने वेगवेगळे अर्थसंकल्प मांडलेले पाहिले, अनुभवले. कृषीप्रधान असलेल्या महाराष्ट्रात कृषीला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न झाले. परंतु ज्या कारणासाठी वैचारिक संघर्ष महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी दिला त्या महिलांसाठी अभिनव योजना अजित पवार यांनी यावेळी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्रात दिली. त्या लाडक्या बहिण योजनेचे भव्य स्वागत महाराष्ट्रातील महिला भगिनींनी केला असे समाधान सुनिल तटकरे यांनी व्यक्त केले.

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत दावणगाव-येणकी आणि प्रजिमा-३१ ते आडोळ तांडा रस्ता कामाचे भूमिपूजन

### उदगीर, जळकोट तालुक्यात मूलभूत सुविधा निर्मितला प्राधान्य दिले - क्रीडा व युवक मंत्री संजय बनसोडे




लातूर, दि. १८ : उदगीर, जळकोट तालुक्याच्या विकासासाठी मूलभूत सुविधा निर्मितीवर भर देण्यात आला. यासाठी रस्त्यांच्या कामांना गती देवून दळणवळण सुविधा बळकटीकरणासह प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून नागरीकांना चांगल्या आरोग्य सेवा देण्यास प्राधान्य देण्यात आल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना योजनेंतर्गत उदगीर तालुक्यातील दावणगाव-येणकी रस्त्याच्या भूमिपूजनप्रसंगी दावणगाव येथील कार्यक्रमात ना. बनसोडे बोलत होते. तहसीलदार राम बोरगावकर, गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता आसिफ खैराडी, उपअभियंता ज्ञानेश्वर मुकादम, जिल्हा नियोजन समिती सदस्य श्याम डावळे, सिध्देश्वर पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच आडोळ तांडा रस्ता कामाच्या भूमिपूजनप्रसंगी माजी आमदार गोविंद केंद्रे उपस्थित होते. कोणत्याही भागाच्या विकासासाठी चांगल्या दळणवळण सुविधा आवश्यक असतात. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यातील विविध रस्त्यांच्या बळकटीकरणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे रस्त्यांचा दर्जा सुधारण्यास मदत होवून प्रवास गतिमान व सुखकर झाला. यासोबतच तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय सुरू करून चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केल्याचे ना. बनसोडे म्हणाले.

विजेचा पुरवठा योग्य दाबाने आणि सुरळीतपणे होण्यासाठी वीज वितरण प्रणालीचे बळकटीकरण करण्यात आले. तसेच पाच नवीन विद्युत उपकेंद्रांची निर्मिती करण्यात आल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. छोटे- छोटे बंधारे, पाझर तलाव, बॅरेज उभारून उदगीर, जळकोट तालुक्यात सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. सर्वच समाज घटकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामे केल्याचे ना. बनसोडे म्हणाले. तसेच उदगीर येथे नवीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय मंजूर झाले असून येत्या काही दिवसांत त्याचे उद्घाटन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

दावणगाव येथील कार्यक्रमात धनंजय वाघमोडे, श्याम डावळे, शिवाजी भोळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपअभियंता श्री. मुकादम यांनी केले. तसेच आडोळ तांडा येथील कार्यक्रमात माजी आमदार गोविंद केंद्रे, वैजनाथ तोंडारे यांनी मनोगत व्यक्त केले.

आडोळ तांड्याला मिळणार पक्का रस्ता उदगीर तालुक्यातील आडोळ तांडा येथे जाण्यासाठी आजपर्यंत पक्का रस्ता नव्हता. या तांड्याला रस्ता करण्याची गेल्या अनेक वर्षांपासून मागणी होती. ना. बनसोडे यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत आडोळ तांडा ते प्रजिमा-३१ दरम्यान जवळपास सव्वादोन किलोमिटर लांबीचा रस्ता मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन ना. बनसोडे यांच्या हस्ते झाले. गेल्या अनेक वर्षांपासून मागणी असलेला रस्ता मंजूर झाला असून त्यामुळे नागरीकांना येणाऱ्या समस्या दूर होतील, असे ते यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्य शासनाने महिलांसाठी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेतून दरमहा दीड हजार रुपये महिलांच्या थेट आधार लिंक बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. सर्व पात्र महिलांनी या योजनेसाठी अर्ज भरण्याचे आवाहन ना. संजय बनसोडे यांनी केले. तसेच शेतकऱ्यांसाठी ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज देण्याचाही निर्णय राज्य शासनाने घेतल्याचे त्यांनी सांगितले.

## काँग्रेस भवन येथे इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारणार

लातूर : प्रतिनिधी लातूर काँग्रेसकडून आगामी विधानसभेच्या निवडणुकीकरिता उमेदवार चाचपणीची तयारी सुरु करण्यात आली आहे. लातूर काँग्रेसच्या वतीने दि. १९ जुलै ते ९ ऑगस्टपर्यंत काँग्रेस भवन लातूर या ठिकाणी लातूर जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून अर्ज स्वीकारले जाणार आहेत. नुकत्याच पार पडलेल्या लातुर लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाले. या निवडणुकीत सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या सूक्ष्म नियोजनातून तसेच काँग्रेस पक्ष पदाधिकारी,कार्यकर्त्यांच्या मेहनतीतून लातूर लोकसभेत 'मविआ'चे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा दणदणीत विजय झाला आणि लातूर जिल्हा परत एकदा काँग्रेसच्या ताब्यात आला. आणि आता आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने कंबर कसली असून या अनुषंगाने लातुर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यासाठी सुरुवात केली आहे.

यासाठी काँग्रेस पक्षाने प्रवीण सूर्यवंशी (७०४५४७१५१४) प्रा. ओमप्रकाश झुरूळे (८७८८६३९३७४) व अॅड. देविदास बोरुळे पाटील (९९२२५६९२२५) यांची नियुक्ती केली असून सकाळी ११ ते २ या वेळेत काँग्रेस भवन लातूर येथे सदरील अर्ज स्वीकारतील. तरी इच्छुक उमेदवारांनी या वेळेमध्ये काँग्रेस भवन लातूर येथे आपले मागणी अर्ज दाखल करावे जेणेकरुन प्रदेश काँग्रेसकडे त्या अर्जांची माहिती सादर करण्यात येईल अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष अॅड. किरण जाधव यांनी दिली आहे.


द्वितीय पुण्यस्मरण

तत्त्वदर्शी प्रज्ञावंत कवयित्री व लेखिका

वै. सौ. उर्मिला वि. कराड

थोर शिक्षणतज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या सुविद्य पत्नी

माईर्स एमआयटी परिवाराच्या वात्सल्यमूर्ती



फुललेला संसार....

भरला संसार हा माझा पाखरांची किलबिल
हास्यपुष्पांच्या कळ्यांची अंगणात पखरण
सुवासिक सुगन्धाची माझ्या दारी दरवळ
बाल निष्पाप जीवांच्या मूक भावांचे संगीत

अशा सुखद घरात जीव वेडा विहरतो
मातृवत्सल भावांनी माझे मन रिझवितो
वात्सल्याच्या संगीताने मातृत्वाला जागवितो
अंगाईच्या सुरातच सुख सारे साठवितो.

-उमा

शब्दाई प्रकाशन आयोजित

मा. उर्मिला वि. कराड लिखित

कृतज्ञ मी कृतार्थ मी, कीर्तनपुष्प, समीर

या पुस्तकांचा

|| प्रकाशन समारंभ ||

हस्ते: डॉ. श्रीपाल सबनीस, सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत

अध्यक्ष: मा. उल्हासदादा पवार, ज्येष्ठ अभ्यासक

प्रमुख उपस्थिती

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, संस्थापक-अध्यक्ष, माईर्स एमआयटी विश्व शांती विद्यापीठ, पुणे, भारत, निर्माते - विश्व शांती घुमट

प्रा. इंद्रजित भालेराव, सुप्रसिद्ध कवी, लेखक

डॉ. माधवी वैद्य, ज्येष्ठ लेखिका, कवयित्री

स्थळ

संत ज्ञानेश्वर सभागृह

एम.आय.टी.वर्ल्डपीस युनिव्हर्सिटी, कोथरूड, पुणे | शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी, सकाळी १०.३० वा.

याप्रसंगी

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज

ह. भ. प. श्री. बापूसाहेब मोरे-देहूकर,

मु.पो. देहूगांव, पुणे यांचे सुश्राव्य कीर्तन शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी, सायं. ५.१५ वाजता होईल व त्यानंतर महाप्रसाद दिला जाईल.

कार्यक्रम स्थळ : ज्ञानमंदिर, प्लॉट नं. १९, राजपथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, रामकृष्ण परमहंस नगर, पौड रोड,कोथरूड, पुणे-४११०३८

आपले विनित : समस्त कराड परिवार

## संपादकीय....

# महाराष्ट्राची 'माती'कला!

तेजःपुंज विद्वान आणि संस्था उभारणी या दोन्ही गोष्टी दुरापास्त होत असताना आहे ते जपता न येण्याचा कृतघ्नपणा महाराष्ट्राने आणि तोही पुण्यात करू नये. दक्षिण आफ्रिकेत हिंदी बांधवांसाठी मोहनदास करमचंद गांधी काही करू पाहत असताना त्यांच्या चळवळीसाठी निधीची गरज लागली, तेव्हा पुण्यातून गोपाळ कृष्ण गोखले यांनी आपल्या ब्रिटिश प्रकाशकास स्वतःच्या मानधनातून निधी देण्यास सांगितले. त्याने केवळ १०० रुपये पाठवल्यावर रागावलेल्या गोखले यांनी त्यास लिहिले : ''माझ्या खात्यात फक्त सात हजार रुपये आहेत; तरी मी त्यातील हजारभर दिले आणि वेळ आल्यास सगळेच्या सगळे देईन.'' हे असे नेक नामदार गोखले हे महात्मा गांधींचे गुरू. देश निर्मितीसाठी आवश्यक बुद्धिमान, नेक कार्यकर्ते घडवावेत या हेतूने ना. गोखले यांनी १९०५ साली 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'ची स्थापना केली. त्यांच्या कार्याचे महत्त्व ओळखणाऱ्या पहिल्या काहींत जमशेटजी टाटा यांचे कनिष्ठ पुत्र सर रतन टाटा यांचा समावेश होता आणि त्यांनी ना. गोखले यांच्या कार्यास आर्थिक पाठिंबाही दिला होता. दुर्दैवाने ना. गोखले अकाली गेले. त्यांच्या स्मरणार्थ सर रावबहादूर काळे यांनी पुण्यात १९३० साली 'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स' या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली आणि विख्यात अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या हाती तिची धुरा सोपवली. तेव्हापासून या संस्थेने भारतीय अर्थशास्त्र, अर्थविज्ञान आणि यांच्या आधारे अर्थनियोजनार्थ जे कार्य केले त्यास तोड नाही. स्वतः गाडगीळ, वि. म. दांडेकर, नीलकंठ रथ आदी उच्च दर्जाच्या अर्थवेत्त्यांनी या संस्थेस बौद्धिक नेतृत्व दिले. प्रगती, गरिबी ते अनुशेष अशा विविध घटकांच्या मापनाचे शास्त्रशुद्ध मापदंड निश्चित करण्यात या मंडळींचा मोठा वाटा होता. त्यामुळे महाराष्ट्रातील निखळ बौद्धिक संस्थांत तिची गणना होते. या संस्थेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या 'काळे स्मृती व्याख्यानमाले'त आपली बुद्धिसेवा सादर करणाऱ्यांच्या नावावर नजर टाकली तरी या संस्थेचे 'असणे' किती मौल्यवान आहे हे कळावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जॉन मथाई, चिंतामणराव देशमुख, द. गो कर्वे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पी. सी. महालनोबीस, वि. म. दांडेकर, आय. जी. पटेल, मे. पु. रेगे, मनमोहन सिंग, व्हर्गीस कुरियन, जगदीश भगवती, रघुराम राजन आदी किती नावे सांगावीत! समग्र महाराष्ट्रास अभिमान वाटावा अशी ही संस्था आज दुर्दैवाने भलत्याच कारणांसाठी चर्चेत आहे. या संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांना अस्थिर करण्याचे प्रयत्न हे त्याचे कारण. अन्य अनेक विद्यापीठांच्या कुलगुरूंप्रमाणे डॉ. रानडे यांस हे पद कोणाच्या चिठ्ठीचपाटीने व सत्ताधाऱ्यांच्या वैचारिक कुलपीठाकडून आलेल्या शिफारशीने मिळालेले नाही. तसेच हे पद मिळाल्याने डॉ. रानडे अधिक मोठे होतात असेही नाही. हे पद मिळण्याआधीही डॉ. रानडे यांचा लौकिक सर्वदूर होता आणि पंतप्रधानांस केंद्रीय पातळीवर ज्यांचे म्हणणे ऐकावे असे वाटते अशांमध्ये त्यांची गणना होती आणि अजूनही आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात सध्या ज्यांचे अमाप पीक आलेले आहे अशा सत्तापदस्थांस लोंबकळत राहणाऱ्या खटपटखोरांत डॉ. रानडे यांची गणना होऊ शकत नाही. ज्यांची सत्ता, त्यांच्या रंगाच्या टोप्या घालून मिरवणाऱ्यांची संख्या या प्रांतात कमी नाही. डॉ. रानडे यांस अशा कोणत्याच रंगाची टोपी घालण्याचा रस नाही. या टोपी घालणाऱ्यांच्या संस्कृतीमुळे होते काय तर त्या टोपीखालच्या डोक्यात काय आहे, काय नाही यापेक्षा त्या टोपीच्या रंगावरच ती घालणाऱ्याचे वर्गीकरण केले जाते आणि टोपीवाल्यांच्या झुंडी तयार होतात. या झुंडीस घाबरून अनेक जण त्या त्या काळात चलती असलेल्या रंगांच्या टोप्या डकवण्यास आपली डोकी देतात. अशा वातावरणात अशी कोणत्याही रंगाची टोपी घालण्यास नकार देणे हा तसा गुन्हाच. तो डॉ. रानडे यांनी निश्चित केला असणार. त्यामुळे नेमणुकीस दोन वर्षे झाल्यानंतर ते या पदास किती अपात्र आहेत वगैरे चर्चा सुरू होते. तिचा स्तर पाहिला की महाराष्ट्राची बौद्धिक अधोगती किती झपाट्याने सुरू आहे हे लक्षात येईल. डॉ. रानडे यांस अपात्र ठरवण्याच्या मागणीचे एक कारण म्हणजे त्यांच्या गाठीशी अध्यापनाचा पुरेसा अनुभव नाही. वास्तविक नव्या शैक्षणिक धोरणात 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' नेमता येण्याची तरतूद आहे. म्हणजे जी व्यक्ती शैक्षणिक क्षेत्रातील नाही पण जिच्याकडे काही दशकांचा कार्यानुभव आहे तीस संबंधित विषयात प्राध्यापक म्हणून यापुढे नेमता येईल. या शैक्षणिक धोरणात ज्या काही मोजक्या चांगल्या बाबी असतील, त्यामधील ही एक. यामुळे व्यावसायिक, लष्करी आदी क्षेत्रांतील उच्चपदस्थांस यापुढे प्राध्यापकी करता येईल. त्यामुळे डॉ. रानडे प्राध्यापकपदासाठी सर्वार्थाने पात्र ठरतात आणि जी व्यक्ती प्राध्यापकपदासाठी योग्य ठरते ती कुलगुरूपदासाठी आपोआप निवडयोग्य ठरू शकते. तेव्हा डॉ. रानडे यांच्याबाबतच्या या आक्षेपास अर्थ नाही. तो घेतला गेल्यानंतर त्यावरून ज्यांनी रानडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली, ते राजीव कुमार सरकारने स्वहस्ते निकम्मा आणि निरर्थक करून टाकलेल्या निती आयोगाचे माजी प्रमुख होते. त्यामुळे या सगळ्यास किती महत्त्व द्यावे हा मुद्दा आहेच. तेव्हा डॉ. रानडे यांस या संस्थेत राहू दिले जाणार की नाही हा मुद्दा नाहीच मुळी. तर एका ऐतिहासिक, बुद्धिगम्य संस्थेचे आपण काय करणार हा प्रश्न आहे. आपल्या संस्थेशी समाजाची नाळ जोडली जायला हवी, असे धनंजयराव गाडगीळ यांस वाटे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी विविध अभ्यास पाहण्या त्या वेळी हाती घेतल्या. गरिबी कशी मोजावी येथपासून ते किमान वेतन कसे आणि किती असावे या आणि अशा अनेक प्रश्नांवर या संस्थेत संशोधन झाले आणि त्या संशोधनाने अनेक पुढच्या पिढ्यांना अभ्यासाचा शास्त्रशुद्ध मार्ग दाखवला. ही बाब फार मोठी. याचे कारण आपल्या शैक्षणिक संस्थांतील पंडितांचा बाहेरच्या जगातील वास्तवाशी काडीचाही संबंध नसतो ही सार्वत्रिक आणि न्याय्य टीका गोखले संस्थेस तरी लागू होत नाही. याच समाजाशी जोडलेले राहण्याच्या परंपरेचा भाग म्हणून विविध क्षेत्रांतील ज्ञानवंत, गुणवंतांनी आपल्या संस्थेत यावे असा प्रयत्न डॉ. रानडे करताना दिसतात. दुसरा लक्षणीय मुद्दा म्हणजे अर्थक्षेत्रातील ज्ञान मराठी भाषेत यावे यासाठी या संस्थेने सातत्याने केलेले प्रयत्न. डॉ. गाडगीळ, मूळचे ओडिशाचे असलेले डॉ. रथ, दांडेकर आदींनी आवर्जून मराठीतून लेखन केले. इतिहासातील अनेक प्रकांड पंडितांचे मूळ मराठीतील लेखन या संस्थेने प्रसिद्ध केले. या संदर्भात ''चार जुने अर्थशास्त्रीय ग्रंथ (१८४३-१८५५) : रामकृष्ण विश्वनाथ, लोकहितवादी, हरि केशवजी, कृष्णशास्त्री चिपळूणकर'' या गोखले संस्थेच्या प्रकाशनाचा उल्लेख करावा लागेल. यातील अनेकांची नावेही अलीकडे अनेकांस ठाऊक नसतील.

# काय गरज आहे काचेच्या इमारतींची, सन-डेक आणि झगमगाटाची?


कुठलंही, कसलंही डिझाईन हे काही उद्देशानंच असलं पाहिजे आणि हे उद्देश मुख्यत्वे अपेक्षित वापर, वापराचं कारण, वापरातील सहजता व सुरक्षितता ध्यानी घेऊनच ठरवले गेले पाहिजेत. केवळ कुणाचं अनुकरण आणि तेही मुळातल्या डिझाईनचे संदर्भ लक्षात न घेता करत गेलो तर उपाय कमी व अपाय जास्त होतो याची खालीलप्रमाणे अनेक उदाहरणं पदोपदी दिसतात. -गेल्या एक-दोन वर्षांत, जलद धावणाऱ्या नविन प्रकारच्या रेल्वे गाड्यांना गायी- म्हशी धडकल्याच्या आणि गाडीचं नुकसान झाल्याच्या काही बातम्या लागोपाठ वाचनात आल्या. गायी-म्हशींचं काय झालं हा भाग वेगळाच. पूर्वी गाड्यांना इंजिनापुढे खालच्या अंगाला अगदी मजबूत लोखंडी जाळ्या असत. त्या रुळावर असलेले अडथळे बाजूला सारत इंजिन सुरक्षित ठेवत. भारतात सर्वदूर पसरलेले रेल्वे मार्ग खुले असतात. गाईगुरंच काय माणसं अन वाहनंही सर्रास रेल्वे मार्ग ओलांडतात. गाड्यांचं डिझाईन करताना हा मुद्दा नजरेआड करून कसे चालेल? भले या नविन गाड्यांची इंजिनं एरोडायनॅमिक आकारामुळे बंदुकीच्या गोळीगत रुबाबदार दिसत अन सुसाट धावत असली तरी. -परदेशातल्या मोटारगाड्यांप्रमाणे आमच्याकडेही गाड्यांना सन-रुफ्स, कमीतकमी ग्राउंड क्लिअरन्स, दिवसाही पेटते रहाणारे एलईडी दिवे असणं गरजेचं तर नाहीच, उलट पर्यावरणाचीही हानी करणारं आहे. -बरीचशी नविन बांधकामं, नविन इमारतींचे आराखडे हे बहुतांशी मुळ चारपाच आराखड्यांच्या भ्रष्ट नकला असतात. त्यात वर अजून, काही ठोस कारण नसताना केवळ स्वस्त अन झटपट उरकणारा पर्याय म्हणून काचाच काचा वापरल्या जातात. ल्युमिनीयमची तकलादू क्लॅडींग्ज लावण्यात येतात. खिडक्यांच्यावर ऊन-पाऊस लागू नये म्हणून पूर्वी असे तशी काँक्रीटची पाळी वा सज्जा ठेवलाच जात नाही. गॅलरी जाऊन त्याऐवजी सन-डेक वा फ्लॉवर डेक असा काहीतरी धेडगुजरी प्रकार माथी मारला जाऊ लागला आहे.



-पूर्वापार चालत आलेली, आम्ही अगदी लहानपणापासून ते अगदी अलीकडील १२-१५ वर्षांपूर्वीपर्यंत पाहत आलेली, आपल्या मातीतली पर्यावरणानुकूल झाडी सोडून कुठलीतरी देशविदेशातली शोभेची झाडी लावण्याचं खूळ तर बिल्डर्सपासून ते नगरपालिकांपर्यंत सर्वत्र पसरलं आहे. या झाडांचा ना सावलीकरता उपयोग ना फळांकरता ना लाकडाकरता. पक्षी त्यांच्या वाऱ्यालाही उभे रहात नाहीत. त्यांच्या फांद्यांवर घरटी बांधत नाहीत. -बाजारपेठांमध्ये, दुकानांमध्ये, मॉल्समध्ये ढणाढणा इतके दिवे जळत असतात, खरंच का आवश्यक असतात ते? किती तरी वीज खर्ची पडून केवळ उष्मा वाढतो. पूर्वी साध्या पणत्या, निरांजनं, कंदिलांनी साजरे होणारे आमचे सण, आज घराघरात, रस्त्यारस्त्यात, झाडाझाडांवर होणाऱ्या चिनी बनावटीच्या रोषणाई शिवाय पार पडेनासे झाले आहेत. उष्णता अन प्रदूषण वाढलं म्हणून एसी वापरावे लागताहेत अन एसीमुळे अधिक प्रदूषण होऊन उष्णता अधिकच वाढू लागली आहे. १२-१५ वर्षांपूर्वी गाड्यांमध्ये एसी फारसे आढळत नसत, आज एसीशिवाय गाडीचा विचारही करू शकत नाही. अगदी काल परवाची गोष्ट, एक मित्र घणसोली येथील रिलायन्सच्या ट्विन टॉवर्सचे कौतुक सांगत होता. छानच आहेत त्या इमारती, आतून आधुनिक सोयीसुविधाही असतील. बाहेरून मात्र पाहावयास मिळतो तो, वर उल्लेख केल्याप्रमाणे काचा व ल्युमिनियमचा मुक्त वापर. गेल्या दीड-दोन दशकांपासून अनेक इमारती याच धर्तीवर उभारल्या गेल्या आहेत, अन आजही अधिकच जोमानं उभारल्या जाताहेत. मुंबईसारखी महानगरंच नव्हे तर खेडोपाडीसुद्धा हे लोण पोहोचलं आहे. जगभरातील मोठ्या महानगरांची, गगनचुंबी अन झगमगत्या दिमाखदार इमारतींनी उजळून गेलेली अनेक दृष्यं वा छायाचित्र आपण सिनेमा, मासिकांतून पहात आलो आहोत. एकीकडे हे चित्र तर दुसरीकडे, आम्हा सामान्यजनांस फारशा ज्ञात नसलेल्या, अशाही काही इमारती जगात आहेत, की ज्यांच्या प्रत्येक मजल्यावर, प्रत्येक फ्लॅटला जोडून खास हिरवीगार झाडी असलेल्या गच्च्या वा सज्जे आहेत. सारी इमारत गर्द झाडांनी नखशिखांत मढलेली. अर्थातच अशा इमारती बांधण्याचा अन त्यांच्या देखभालीचा खर्च हा पारंपारिक इमारतींपेक्षा जास्त असणार. बरं, एक निसर्गाभिमुख, पर्यावरणपूरक हिरवेपण सोडलं, तर या इमारती केवळ इमारत म्हणून काही अधिक डौलदार वा देखण्या असतातच असं नाही. मग तरीही, जास्त खर्च करून हे असं काही उभारण्याचा अट्टहास करणारी, अन अशा घरांत रहाणारी वा कार्यालयं थाटणारी ही मंडळी कोण असावीत? तर, ज्यांना पर्यावरणाची चाड आहे आणि आहे ती परिस्थिती भयावह आहे याची जाणीव आहे, अशी मंडळी! विश्वातल्या मोजक्या अतिश्रीमंत अब्जाधीशांच्या अव्वल यादीतली, मुलाबाळांच्या लग्नसोहळ्यांवर हजारो कोटी खर्च करणारी अनेक मंडळी भारतातच काय, तर अगदी मुंबईतही आहेत. परंतु, वेळ पडली तर, पर्यावरण अधिकच धोक्यात आणणाऱ्या काचा अन ल्युमिनियमच्या इमारती बांधण्याऐवजी पर्यावरणाशी नाळ जपणारी, आपल्या शहराचा, राज्याचा व देशाचाही मानबिंदू ठरू शकेल अशी हिरवाईनं नखशिखांत मढलेली नवलप्राय इमारत बांधायचा का विचार केला जात नसेल? असा खिन्न विचार मनी आल्याशिवाय रहात नाही. इथे विषय डिझाईन्स, इमारत बांधणी वा श्रीमंतांकडून अपेक्षा हा अर्थातच नाही. तर निसर्गाची अन पर्यायानं पृथ्वीची आजतागायत झालेली अन् होतच चाललेली अपरिमित हानी हा आहे. अशा कितीतरी गोष्टी आहेत की ज्या आपल्या स्थळकाळाचा अन हवामानाचा, ऋतूमानाचा विचार केला तर अस्थानी अन अनाठायी ठरतात. साधा दगड वापरायचा म्हटला तरी कुठेतरी जमीन खणूनच काढावा लागतोय. सिमेंटही बनतं त्यात केवळ दगडच नव्हे तर अनेक खनिजं अन रसायनं मिसळावी लागतात. आज ज्या प्रचंड प्रमाणात सिमेंट, काचा, ल्यूमिनियम, लोखंडी सळया-गर्डर्स वापरले जाताहेत त्यांच्या निर्मितीची किंमत केवळ पैसाच नाहिये, तर पर्यावरणाची परत कधीही भरून न येणारी हानी सुद्धा आहे. खनिजं उकरून काढतोय, परत कशी निर्माण होणार? प्रक्रियेकरता उर्जा वापरतोय, ती किती पुरणार? जिथे शक्य आहे तिथे लोखंडाऐवजी लाकडी खांब वा बांबू वापरले तर त्यांची परत लागवड होऊ शकते, निसर्गचक्र चालू राहू शकतं. पर्यावरणाची हानी तर सर्वांत आहेच, पण त्यातल्या त्यात कमी हानीकारक पर्याय वापरणं तरी आपल्याकडून व्हावं. खेडोपाडी दारा-अंगणात बांबू उपलब्ध असतात, तर अशा ठिकाणी लहानसहान शेड वगैरे बांधायला लोखंडी अँगल्स किंवा पाईप्स न वापरता बांबू वापरावेत. कारण, बांबू छाटले तरी परत नविन वाढ होतच असते, झाडं तोडावी लागली तरी जाणीवपूर्वक ध्यानात ठेवून चार नविन झाडं लावावी. लोखंड वापरलं तर कापायला व वेल्डिंग करायला परत वीज वापरावी लागते अन वीज तयार करण्यासाठी परत निसर्ग ओरबाडणं आलंच. लोखंड, ल्युमिनियम, काचा, सिमेंट यांच्या वापरामुळे तापमान वाढतं, रात्र झाली तरी उष्णता निवत नाही. पूर्वी पहाटे तरी थोडा गारवा वाटायचा, पण आता पहाटेही घाम येतो. साहजिकच आहे, जमिन माती अशी फारशी राहिलीच नाही, सर्वत्र फरसबंदी, पेव्हर ब्लॉक, सिमेंट किंवा डांबर असल्याने दिवसभर ते तापतच जातं अन तापमान कमी होण्याआधीच सकाळ होऊन सूर्य पुन्हा उगवलेला असतो. त्यात भर म्हणजे झाडंही नाहीत. पावसाचं पाणी जमिनीत झिरपत, जिरतच नाही, सारं वाहून वाया जातं. शेतीची माती उकरून त्याच्या विटा भाजून विकून, उरल्या त्या जमिनी नापीक केल्या जाताहेत. आज बंगलोरसारखं प्रागतिक शहर हे पाण्याच्या दुर्भिक्षामुळे बातम्यांत येतं. विविध भागांतल्या उष्माघाताच्या बातम्या नित्यनेमानं प्रसारित होताहेत.

उंदीर-घुशी जशा फरसबंदीखालील जमीन पोखरून बिळांच जाळं तयार करून ठेवतात तसं आज आपण विविध खनिजांकरता खाणी खणून पृथ्वी कित्येक ठिकाणी पोखरून बकाल अन भकास केली आहे. जे घडायला, साठायला अब्जावधी वर्षं गेली ते उधळून टाकून आपण कफल्लक होण्याच्या मार्गावर आहोत. जे सारं काही मिळून ही पृथ्वी बहरलेली होती तेच जर संपुष्टात येत चाललंय तर पृथ्वीचा बहर ओसरणारच. पृथ्वी ज्या २३-२४ अंशानं कललेल्या अक्षाभोवती फिरतेय, ज्या विशिष्ट स्थितीमुळे आपण हवामान, ऋतुमान अनुभवतोय तो अक्ष आता डळमळीत होत की काय अशी धास्ती निर्माण झाली आहे. कारण भूगर्भातल्या गोष्टींचा नैसर्गिक समतोल ढासळला आहे. गाभा अन बाह्य थर यातील अंगचा असणारा समतोल ढासळला आहे. एकीकडून अतिरेकी प्रमाणात काही काढलं जातंय, तर दुसरीकडे विवेकशून्यपणे एकवटलं, रचलं जातंय. हा अक्ष आता थोडा जरी अधिक इकडेतिकडे झाला तर पृथ्वीवर केवळ विविध नैसर्गिक उत्पातांचीच शक्यता उरते. कुठं निघालो आहोत आपण? काय करतोय? मानव सारा निसर्ग वेठीस धरून जमिनी टेकड्या डोंगर ओरबाडत आहे. पृथ्वीची प्रकृती ढासळली आहे. यासाठी आपण फारसं काही करू शकणार नाही म्हणून सरकारी तसंच जागतिक पातळीवर दूरदृष्टी, वैचारीक प्रगल्भता अन राजकीय इच्छाशक्ती असणं आवश्यक आहे. असो, सर्वसामान्यांनी जरी योग्यायोग्यतेचं हे भान पदोपदी बाळगलं तरी पुष्कळ. नाहीतर हे केवळ अरण्यरुदनच!

# आपल्या आमदारांनी या अधिवेशनात काय काम केलं?



महाराष्ट्र विधानसभा निवडणूक तीन महिन्यांवर आली आहे. चौदाव्या विधानसभेचं अखेरचं (पावसाळी) अधिवेशन गेल्या आठवड्यात समाप्त झालं. ही विधानसभा विविध कारणांनी अभूतपूर्व ठरली. त्यासंदर्भात गेल्या पाच वर्षात घडलेल्या पहाटेच्या घडामोडी सगळ्यांनाच माहीत आहेत. पण त्या पलीकडे जाऊन आपण ज्यांना आपले लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिलं त्या आमदारांनी काय काय कामं केली, त्याचा आढावा आपण घेतला आहे का? घेतो का? जिल्हानिहाय तारांकित प्रश्न १३ दिवस चाललेल्या पावसाळी अधिवेशनाचा सुमारे १६९ कोटी रुपये खर्च झाला. तो जनतेच्या तिजोरीतून झाल्याने तिथे जनतेच्या हिताची किती कामं झाली याची नोंद आपल्याकडे असायला हवी. प्रत्येक अधिवेशनात उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नांचा आम्ही 'संपर्क'तर्फे विशेष अभ्यास करतो. आरोग्य, शिक्षण, बालक, महिला या विषयांवर आमचा भर आहे. आमदारांना आम्ही प्रश्न पाठवतोदेखील. आम्ही पाठवत असलेल्यापैकी २५ ते ३०% प्रश्न सभागृहात पटलावर येतात. आत्ताच्या पावसाळी अधिवेशनात आम्ही पाठवलेल्या ३१ पैकी नऊ प्रश्न विचारले गेले. विधानसभेत ५,५७१ प्राप्त तारांकित प्रश्नांपैकी ३३७ उत्तरित झाले. त्यापैकी ८८ राज्यव्यापी आणि उर्वरीत २४९ प्रश्न वेगवेगळ्या जिल्ह्यांपुरते होते. सर्वाधिक ५६ प्रश्न मुंबई जिल्ह्यातून विचारले गेले. त्याखालोखाल पुणे ३१, ठाणे २१, पालघर १७, रायगड १३, नागपूर ११, रत्नागिरी १०, नाशिक १०, बुलढाणा ९, परभणी ६ तर गडचिरोली, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर प्रत्येकी ५, अहमदनगर, अमरावती, जळगांव, सांगली, सोलापूर व सातारा प्रत्येकी ४, बीड, भंडारा, कोल्हापूर, नांदेड, सिंधुदुर्ग व वर्धा प्रत्येकी ३, अकोला, धुळे, नंदूरबार प्रत्येकी २ तर यवतमाळ, गोंदिया प्रत्येकी १ प्रश्न उपस्थित व उत्तरीत झाले. तर वाशिम, भुसावळ, लातूर, जालना, हिंगोली, धाराशिव या ६ जिल्ह्यातून एकही प्रश्न सभागृहात स्वतंत्र चर्चेस आला नाही.महिला-बालक, अंगणवाडी संबंधित प्रश्नांचे विषय प्रसुतीपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंध (पीसीपीएनडीटी) कायद्याची प्रभावी अंमलबजवणी, लेक लाडकी योजनेची अंमलबजावणी, निकृष्ट दर्जाचा पूरक पोषण आहार, बालसंगोपन योजने अंतर्गत अनुदान, बालसुधारगृहाच्या जागेवर अवैध बांधकाम, अंगणवाडी सेविकांच्या, मदतनीसांच्या प्रलंबित मागण्या, डोंबिवलीच्या हॅप्पी किडस् डे केअर सेंटरच्या चालकाने लहान मुलांचा केलेला छळ, स्मार्ट अंगणवाडी अंतर्गत सुविधा, अंगणवाडीतील सुविधा, थॅलेसेमियाग्रस्त मुलांना मोफत रक्तपुरवठा, बुलढाणा जिल्हा स्त्री रुग्णालयांतील गैरप्रकार, मुंबई शहरात नवजात बालकांची होणारी विक्री, चिंचवडच्या (जि.पुणे) एल्प्रो इंटरनॅशनल स्कूल शाळेत तीन वर्षाच्या मुलीला केलेली मारहाण, महावितरण कार्यालयात केलेली कर्मचारी महिलेची हत्या, प्रधानमंत्री मातृवंदन योजनेंतर्गत लाभ मिळत नसल्याची प्रकरणं.

सार्वजनिक आरोग्यसंबंधित प्रश्नांचे विषय महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या विम्याची व्याप्ती वाढवणं, 'झिरो प्रिस्क्रीप्शन' धोरणाची अंमलबजावणी, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत रुग्णांना मिळणारे अपुरे लाभ, हिमोफिलीया रुग्णांसाठी डे-केअर सेंटरची संख्या वाढविणं, शासकीय रुग्णालयातील गैरप्रकार, जिल्हास्तरावर डे-केअर केमोथेरपी केंद्र सुरू करणं, रुग्णवाहिका पुरवठा निविदा प्रक्रिया, कुष्ठरोग समूळ उच्चाटनासाठी उपाययोजना, रुग्णालयांमध्ये टोक्सिकोलॉजिकल स्क्रिनिंग यंत्रणा कार्यान्वित करणं, राज्य कामगार विमा योजनेतली रुग्णालयं सक्षमपणे चालवण्यासाठी उपाययोजना.पर्यावरणासंबंधित प्रश्नांचे विषय कोकणासह राज्याच्या विविध भागात होत असलेली अवैध वृक्षतोड, पालघर जिल्ह्यात नष्ट होत असलेलं खारफुटीचं जंगल, अनधिकृत गौण खनिज उत्खनन, वीज पडण्याची पूर्वसूचना देणाऱ्या यंत्रणेची निकड, अवैध पध्दतीने सुरु असलेले स्टोन क्रशर, व्याघ्र प्रकल्पालगत अवैध बांधकाम, वाळू तस्करीतून होणारं पर्यावरणीय आणि महसुली नुकसान, वाघांच्या मृत्यूमध्ये होत असलेली धक्कादायक वाढ, भूजल पातळीतील घट, प्लास्टीक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट आणि पुर्नप्रक्रिया, औद्योगिक क्षेत्रातलं प्रदूषण रोखणं, सामूहिक जैववैद्यकीय कचऱ्याचं वर्गीकरण, राज्याच्या नद्यांच्या प्रदूषणातली वाढ, गडचिरोली जिल्ह्यात वन कायद्यातील तरतुदी पारंपरिक रोजगारनिर्मीतीत अडसर ठरत असण्याबाबत.शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे विषय राज्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचा गंभीर प्रश्न, शेतकरी आत्महत्या, पीकविमा नुकसान भरपाई, युरीया खताचा काळाबाजार, अवकाळी पावसामुळे झालेलं नुकसान, मिरची पिकावर रोगाचा प्रादुर्भाव, दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यासाठीच्या जाचक अटी, नैसर्गिक आपत्तीने बाधित शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून मिळणार्या नुकसानभरपाईत दिरंगाई, कापसाचा हमीभाव वगैरे. विधानसभेचं कामकाज पावसाळी अधिवेशनात विधानसभेचं दररोजचं सरासरी कामकाज ७ तास चाललं. एकूण कामकाज ९१ तास २ मिनिटं झालं. ३ तास १९ मिनिटं गोंधळामुळे वाया गेली. २,११५ प्राप्त लक्षवेधी सूचनांपैकी ३८२ स्वीकृत झाल्या. ५ लक्षवेधींवर चर्चा झाली. नियम ९७ अन्वये प्राप्त झालेल्या ५४ सूचनांपैकी एकही स्वीकृत केली गेली नाही. नियम २९३ अन्वये प्राप्त चार सूचनांपैकी २ सूचनांवर चर्चा झाली. सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर ७३ सूचना प्राप्त झाल्या, त्यापैकी २० सूचना मान्य झाल्या. अधिवेशनात विधानसभा सदस्यांची सरासरी उपस्थिती ६७.७८% राहिली. एकूण दहा विधेयकं विधानसभेत ८ आणि विधान परिषदेत २ विधेयकं संमत करण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक २०२४, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (सुधारणा) विधेयक २०२४, महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०२४, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक २०२४, महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा) विधेयक २०२४, महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) विधेयक २०२४, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक २०२४, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक २०२४ आणि महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक २०२४. तसंच, महाराष्ट्र जनसुरक्षा अधिनियम २०२४ हे विधेयक सादर करण्यात आलं आहे. व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांचा अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा त्याअनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी हे विधेयक आणलं असल्याचं राज्य सरकारचं म्हणणं आहे. परंतु विरोधकांनी आक्षेप घेत विधेयकाचा मसुदा संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्याची मागणी केली. या शेवटच्या अधिवेशनातही बोगस खतं आणि बी-बियाणं याबाबत कठोर कायदा करण्याचं २०२३ साली सरकारने दिलेलं आश्वासन पूर्ण केलं नाही आणि २०२१ साली विधिमंडळाने संमत केलेल्या आणि केंद्र सरकारने परत पाठवलेल्या महिला सुरक्षिततेबाबतच्या शक्ती विधेयकावरदेखील चर्चा झाली नाही.विधान परिषदेचं कामकाज विधान परिषदेचं कामकाज दररोज सरासरी ४ तास ३८ मिनिटं झालं. एकूण ६० तास २६ मिनिटं सभागृहाचं कामकाज झालं. मंत्री वेळेवर उपस्थित नसल्याने १० मिनिटं वाया गेली. तर अन्य कारणांमुळे ६ तास १० मिनिटं वाया गेली. प्राप्त एकूण १,४९४ तारांकित प्रस्नांपैकी ४२८ प्रश्न स्वीकृत केले गेले. पैकी ५५ प्रश्नांवर चर्चा झाली. नियम ९३ अन्वये प्राप्त ५२ सूचननांपैकी१३ स्वीकृत झाल्या. नियम २६० अन्वये ४ प्रस्ताव प्राप्त आणि उत्तरित झाले. नियम २८९ अन्वये प्राप्त ३३ प्रस्तावांपैकी एकही स्वीकृत केला गेला नाही. प्राप्त ५४९ लक्षवेधींपैकी १२८ स्वीकृत झाल्या. ३३ सूचनांवर चर्चा घडली. विशेष उल्लेखाच्या प्राप्त १९० सूचनांपैकी १५७ पटलावर मांडल्या. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेमध्ये ८ सूचना प्राप्त झाल्या. सर्व मान्यही झाल्या. एकूण प्राप्त ९० अशासकीय ठराव सूचनांपैकी ७५ स्वीकृत करण्यात आल्या. अधिवेशनासाठी विधान परिषद सदस्यांची सरासरी उपस्थिती ७७.०८ टक्के राहिली. विक्रमाचा विक्रम मोडणाऱ्या पुरवणी मागण्याः या चौदाव्या विधानसभेच्या कार्यकाळात अंतरीम अर्थसंकल्प सादर झाला असतानाही पावसाळी अधिवेशनात पुन्हा एकदा सादर केला गेला. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरचा पुरवणी मागण्यांच्या सर्वाधिक आकारमानाचा गत अधिवेशनातला विक्रमदेखील या अखेरच्या अधिवेशनाने मोडला. सन २०१४ ते २०१९ या काळातील १३ व्या विधानसभेच्या एकूण १६ अधिवेशनांत मिळून १,९१,९८५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या गेल्या होत्या. १४ वी विधानसभा अस्तित्वात आली तेव्हा मविआ सरकारचा पुरवणी मागण्यांवर अंकुश ठेवण्याचा मानस होता. मात्र वादळ, पूर, अतिवृष्टी यांसारखी नैसर्गिक आपत्ती तसेच कोरोना कोविड-१९ विषाणूमुळे आलेली वैश्विक महामारी अशा संकटाना सामोरे जाण्यासाठी मविआ सरकारने आपल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात २१,९९२ कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या. महायुती सरकारने २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात सुमारे ५२,००० कोटी रुपयांच्या, २०२३ च्या पंचामृत अर्थसंकल्पानंतर पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात ४१,२४३ कोटी रुपयांच्या, २०२३ च्या हिवाळी अधिवेशनात एकाच दिवशी, ७ डिसेंबरला ५५,५२० कोटींच्या पुरवणी, २०२४ च्या लोकसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या अंतरीम अर्थसंकल्पीय अधिवेशनात ८,६०९ कोटी रुपयांच्या, आणि या पावसाळी अधिवेशनात अतिरिक्त अर्थसंकल्प मंजूर होताच काही वेळातच सुमारे ९४,८८९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या केल्या. या रकमांवरून सहजच लक्षात येतं की महायुती सरकारने अडीच वर्षांच्या कालखंडात केलेल्या पुरवणी मागण्या मविआ सरकारच्या तुलनेत २,३०,२६९ कोटी रुपयांनी जास्त रकमेच्या आहेत. आर्थिक वर्षात एकूण अर्थसंकल्पाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या असू नयेत, असा संकेत आहे. तो धुडकावून ९४,८८९ कोटींच्या, अर्थसंकल्पाच्या १५ टक्क्यांहून अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प सुमारे ६,१२,००० कोटींचा आहे. यातून वित्तीय तूट वाढणार हे साधं अर्थशास्त्रीय समीकरण आहे. आमदारांना त्यांच्या मतदारसंघात विकासकामं करण्यासाठी दिला जाणारा निधी अपुरा पडत असल्यास पुरवणी मागण्यांची तरतूद केली जातेच.

# मध, गूळाच्या सेवनाने ब्लड शुगर होईल कमी? डायबिटीज रुग्णांना तज्ज्ञांनी दिला 'हा' महत्त्वाचा सल्ला

अनेक जणांना गोड पदार्थ खूप आवडतात. मात्र, वजन वाढेल किंवा शरीरातील साखरेचं प्रमाण वाढेल या भीतीनं काही जण गोड पदार्थ खाण्याचं टाळतात. परंतु, साखरेला पर्याय म्हणून गूळ किंवा मध यांच्याकडे पाहिलं जातं. पदार्थाची गोडी वाढविणाऱ्या या पदार्थांचे काही गुणकारी फायदेदेखील आहेत. त्यातच मधाविषयी जाणून घ्यायचं झालं, तर मध हा अत्यंत गुणकारी आहे. अगदी भूक वाढविण्यापासून ते पचनशक्ती सुधारण्यापर्यंत मधामुळे अनेक शारीरिक फायदे होतात. दुसरीकडे गूळ खाण्याचेही अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. पण मध, गूळ हे पदार्थ रक्तातील साखर नियंत्रणासाठी चांगले आहेत का? याच विषयावर मॅक्स हेल्थकेअरमधील डॉ. मिथल यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबाबत आपण जाणून घेऊ आजकालच्या धकाधकीच्या आणि अस्वस्थ जीवनशैलीमुळे बहुतेक लोक मधुमेहाच्या समस्येने त्रस्त आहेत. मधुमेही रुग्णांना आहाराची विशेष काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टर देतात. मधुमेह ही एक अशी आरोग्य समस्या आहे, ज्यामध्ये माणसाला अनेक बंधनांना सामोरे जावे लागते. मधुमेहाच्या रुग्णाने कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले अन्न सेवन करावे आणि मिठाई पूर्णपणे टाळावी; अन्यथा त्यांच्या शरीरातील साखरेची पातळी वाढण्यास वेळ लागत नाही.



मध हा सोनेरी रंगाचा एक द्रव पदार्थ आहे. मध पारंपरिकपणे गोड पदार्थ म्हणून, तसेच घसा खवखवणे, खोकला नियंत्रित करणे व अ‍ॅलर्जी कमी करणे यासाठी वापरला जातो. त्यात साधारणपणे ३८ टक्के फ्रक्टोज, ३१ टक्के ग्लुकोज, १७ टक्के पाणी व सात टक्के माल्टोज, तसेच इतर साध्या कार्बोहायड्रेट्स, परागकण, अमिनो अ‍ॅसिडस्, एन्झाइम्स व जीवनसत्त्वे यांचा समावेश आहे. फ्रक्टोज सामग्रीमुळे मध पांढऱ्या साखरेपेक्षा गोड आहे आणि त्यामुळे गोडपणा समान प्रमाणात असावा यासाठी तो कमी प्रमाणात वापरला जाणे आवश्यक आहे. पांढऱ्या साखरेपेक्षा मधामध्ये कमी कॅलरीज (सुमारे ३०० कॅलरीज प्रति १०० ग्रॅम) असतात. मधात कॅलरीज, साखर व कार्बोहायड्रेट्स असतात. पण, साखर किंवा साखरेच्या इतर पर्यायांच्या तुलनेत मध रक्तातील साखरेच्या पातळीवर खूप कमी परिणाम करतो. हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. म्हणूनच डॉक्टर मधुमेहाच्या रुग्णांना मध काही प्रमाणात वापरण्याची परवानगी देतात. गुळामध्ये सुक्रोजचे प्रमाण ७० टक्के असते. प्रथिने, पोटॅशियम, मॅग्नेशियम, जीवनसत्त्वे व अँटिऑक्सिडंट्सच्या अंशासह गूळ हा लोहाचा स्रोत आहे. गुळामध्ये लोह असल्यामुळे रक्तदाब नियंत्रित करण्याची क्षमता यासह अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. परंतु पांढऱ्या साखरेपेक्षा गूळ हा थोडा चांगला पर्याय असला तरीही तो साखरेसारखाच आहे. मधुमेहींसाठी गूळ खाण्याचे दुष्परिणाम पांढऱ्या साखरेपेक्षा फारसे वेगळे नसतात. तथापि, जर मधातील साखरेची इतर साखर पर्यायांशी तुलना केली, तर मधाचा रक्तातील साखरेच्या पातळीवर खूप कमी परिणाम होतो. तसा मध आरोग्यासाठी फायदेशीर आहे. म्हणूनच डॉक्टर काही प्रमाणात मधुमेहाच्या रुग्णांना मधाचा वापर करण्यास परवानगी देतात. तथापि मधुमेहींसाठी गूळ, मध सुरक्षित आहे, हा समज विज्ञानाने सिद्ध केलेला नाही, असेही तज्ज्ञांनी स्पष्टच सांगितले.

# रक्त शुद्ध व निरोगी ठेवण्यासाठी हे पाच सुपरफूड्स ठरतील फायदेशीर

शरीर निरोगी राहण्यासाठी शरीरातील रक्त शुद्ध व चांगले राहणे महत्त्वाचे आहे. काही असे सुपरफूड्स आहेत, जे नैसर्गिक औषधाचे कार्य करतात आणि आपल्या शरीराला आवश्यक पोषक घटक प्रदान करतात. हे पोषक घटक आपल्या शरीरातील रक्त व संपूर्ण आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात.



दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना हैदराबादच्या बंजारा हिल्स येथील केअर हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा यांनी पाच सुपरफूड्स सांगितले आहेत, ज्यांचा रक्ताच्या चांगल्या आरोग्यासाठी आहारात समावेश केला पाहिजे. हिरव्या पालेभाज्या पालकासारख्या हिरव्या पालेभाज्या सॅलड तयार करण्यासाठी फायदेशीर आहेत. पण त्याचबरोबर त्यातील लोह या घटकामुळे शरीरातील रक्ताची उणीव दूर होते, असे जी. सुषमा सांगतात. या पालेभाज्यांमध्ये व्हिटॅमिन के असते, जे रक्त गोठण्यापासून वाचवते आणि हाडे मजबूत ठेवते.

बेरी रासबेरी, ब्ल्यूबेरी व स्ट्रॉबेरीमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि फ्लेव्होनॉइड्स असतात; जे रक्तवाहिन्यांचे कार्य सुधारतात, रक्तदाब कमी करतात. त्यामुळे आपले कोलेस्ट्रॉल नेहमी तपासत राहा.

मासे सॅल्मन, मॅकरेल व सार्डिन हे मासे अत्यंत चविष्ट असतात. त्याचबरोबर हृदयाच्या आरोग्यासाठीही ते तितकेच फायदेशीर असतात. ओमेगा -३ फॅटी ॲसिडने समृद्ध असलेले हे मासे जळजळ आणि शरीरास हानिकारक असलेले फॅट्स कमी करतात. त्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी करता येतो.

सुका मेवा आणि बिया सुका मेवा आणि बिया शरीरास ऊर्जा प्रदान करतात. बदाम, चिया सीड्स व जवस हे पदार्थ फक्त स्नॅकसाठीच उपयुक्त नाहीत, तर ते पौष्टिक पदार्थसुद्धा आहेत; जे शरीरास ऊर्जापुरवठाही देतात. त्यात निरोगी फॅट्स, फायबर व प्रोटीन्स असतात; जे कोलेस्ट्रॉल आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याशिवाय सुका मेवा आणि बिया मॅग्नेशियमचा एक उत्तम स्रोत आहे; ज्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते. बीट बीटमध्ये नायट्रेटचे प्रमाण जास्त असते; ज्याचे शरीरात गेल्यावर नायट्रिक ऑक्साईडमध्ये रूपांतर होते. नायट्रिक ऑक्साइड हा घटक रक्तवाहिन्यांना आराम देतो आणि त्यामुळे रक्तप्रवाह सुधारून, रक्तदाब कमी होतो. बीटमध्ये फोलेट व बीटेनदेखील असतात, जे रक्तवाहिन्याशी संबंधित आजारांचा धोका कमी करतात.

या वरील सुपरफूड्सचा तुम्ही आहारात समावेश करून निरोगी जीवनशैली अंगीकारू शकता; ज्यामुळे तुमचे शरीर निरोगी राहण्यास मदत मिळेल.

# कोरफडीचा रस का प्यावा? कसे करावे सेवन? तज्ज्ञांनी केला खुलासा

तुमच्या घरात असलेले काटेरी कोरफडी किती फायदेशीर आहे याचा विचार कधी केला आहे का? सूर्यकिरणांच्या संपर्कात आल्यानंतर होणारी त्वचेची आग कमी कररण्यासाठी कोरफड वापरतात. पण, त्यापलीकडेदेखीलकोरफडीचे अनेक फायदे आहेत हे तुम्हाला माहिती आहे का? कोरफडच नव्हे तर कोरफडीचा रस देखील आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पण, योग्य कोरफडीचा रस कसा निवडायचा हे माहीत असणे आवश्यक आहे. तसेच कोरफडीच्या रसाचे सुरक्षितपणे सेवन करावे, तसेच कधी सेवन करू नये हे देखील माहीत असणे आवश्यक आहे. याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सल्लागार आहारतज्ज्ञ आणि मधुमेह शिक्षक कनिका मल्होत्रा यांनी आतड्यांचे आरोग्य राखणे, शरीरातील पाण्याची पातळी वाढवणे आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यापर्यंत कोरफडीच्या रसाचे अनेक फायदे सांगितले आहेत.



कोरफडीरस पिण्याचे फायदे काय आहेत? आतड्याचे आरोग्य आणि शरीरातील पाण्याची पातळी : कोरफडीचा रस पचनास मदत करू शकतो आणि तुमच्या शरीरातील पाण्याची पातळी संतुलित ठेवू शकतो. साखर किंवा प्रिझर्वेटिव्हज न घालता कमीत कमी प्रक्रिया केलेला रस निवडा. तुमच्या शरीराच्या मिळणाऱ्या फायद्याचे मूल्यांकन करण्यासाठी ३० मिली पातळ केलेला रस घेण्यापासून हळूहळू सुरुवात करा.

व्हिटॅमिन बूस्ट : कोरफडीचा रस काही ब्रँड्स व्हिटॅमिन सी आणि इतर पोषक तत्त्वांनी समृद्ध असतो. रक्तातील साखरेचे नियंत्रण : प्रारंभिक संशोधन संभाव्य फायदे सूचित करते, परंतु अधिक अभ्यास आवश्यक आहे. कोरफडीचा रस पचन : पाण्याची पातळी आणि संभाव्य रक्तातील साखर नियंत्रण यांसारख्या अंतर्गत फायद्यांसाठी आदर्श आहे. हे पाणी टाकून पातळ करून सेवन केले जाऊ शकते.कोरफडीचा रस घेताना या महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवा मल्होत्रा यांच्या मते, कोरफडीचा रस घेताना तुम्हाला काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे:

काय टाळावे : जर तुम्हाला क्रोहन रोग, अल्सरेटिव्ह कोलायटिस, किडनी समस्या किंवा यकृत रोग यांसारख्या पाचक समस्या असतील किंवा त्यासाठी औषधे घेत असाल (रक्त पातळ करणारे, मधुमेहावरील औषधे), कोरफडीचा रस घेण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. सावकाश सुरू करा आणि सेवन मर्यादित करा: थोड्या प्रमाणात, पातळ करून (३० मिली) सुरुवात करा आणि पेटके किंवा अतिसारासाठी लक्षणे जाणवतात का याचे निरीक्षण करा. इलेक्ट्रोलाइट असंतुलन टाळण्यासाठी दररोज शिफारस केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त सेवन करू नका.

कधी आणि किती वेळा घ्यावा कोरफडीचा रस? बहुतेक निरोगी प्रौढांसाठी, सुरक्षित श्रेणी ३० मिली कोरफडीचा रस पाणी टाकून पातळ केला जातो, दिवसातून एक किंवा दोनपेक्षा जास्त वेळा घेऊ नका. मल्होत्रा म्हणतात की, खूप कमी प्रमाणात (टेबलस्पून) सुरुवात करणे आणि तुमच्या सहनशीलतेच्या आधारावर हळूहळू त्याचे प्रमाण वाढवणे चांगले. सातत्यपूर्ण, मध्यम सेवनावर लक्ष केंद्रित करा.

# अनेक गंभीर आजार होतील दूर फक्त एक चमचा धणे, केव्हा आणि कसे करावे सेवन जाणून घ्या

मसाल्यांमध्ये येणारे धणे हे मसाल्यांपैकीच एक पदार्थ आहे. धणे पूड किंवा कोथिंबीर जेवणाची चव तर वाढवतात. तसेच अनेक पदार्थांमध्ये धणे वापरले जातात. धण्यांमध्ये अनेक औषधीय गुण असतात. तर चला जाणून घेऊ या आरोग्यवर्धक धणे कसे अनेक आजार दूर ठेवतात.



धणे सेवनाचे फायदे- डायबिटीज नियंत्रित- डायबिटीजला घरगुती उपायांनी नियंत्रित केले जाऊ शकते. धण्यांमध्ये असे कंपाउंड असतात जे अँटी-हाइपरग्लाइकेमिक, इंसुलिन डिस्चार्जिंग आणि इंसुलिन गती निर्माण करतात. ज्यामुळे शरीरात ग्लुकोजचे प्रमाण योग्य प्रमाणात राहते.

कोलेस्ट्रॉल नियंत्रित- कोलेस्ट्रॉलचे वाढणे आरोग्यासाठी घातक ठरू शकते. तसेच हृदय संबंधित अनेक आजार निर्माण होण्याची शकयता असते. हाय कोलेस्ट्रॉलने स्ट्रोकचा धोका वाढू शकतो. अशामध्ये कोलेस्ट्रॉलला नियंत्रित करण्यासाठी तुम्ही धणे उपयोगात आणू शकतात. धण्यांमध्ये कोरिएन्ड्रिन नावाचे कंपाउंड असते. ज्यामुळे लिपिड पाचनची प्रक्रिया नियंत्रित राहते आणि कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते.

पाचन मजबूत करते- धणे डाइटरी फाइबरचे सोर्स असतात. जे अँटी-ऑक्सीडेंट गुणांनी भरपूर असतात. लिव्हर सुरक्षित ठेवणे याकरिता धणे मदत करतात. ज्या लोकांना अपचनाची समस्या असेल त्यांनी धणे घातलेले पाणी सेवन करावे. त्वचेच्या आजारांना दूर ठेवते- धणे त्वचा आरोग्यदायी ठेवण्यासाठी मदत करता. यामुळे एक्जिमा, खाज, पुरळ आणि सुजणे यांसारख्या समस्या लवकर ठीक होतात. धण्यांमध्ये अँटीसेप्टिक गुण असतात. ज्यामुळे तोंडातील छाले देखील बरे होण्यास मदत मिळते.

केसांसाठी फायदेशीर- केस गळत असतील किंवा अशक्त झाले असतील तर धणे यासाठी फायदेशीर असतात. धण्यांचा उपयोग नवीन केस येण्यासाठी देखील केला जातो. कसा करावा उपयोग- धणे पासून निर्माण होणारी हिरवी कोथिंबीर आहारामध्ये सहभागी करावे. तसेच पदार्थ बनवतांना धणे पूड नक्की वापरावी. तसेच धणे घातलेले पाणी सेवन करावे. रात्री एक ग्लासमध्ये धणे भिजवून सकाळी हे पाणी गाळून सेवन करावे.

# स्वर्ण भस्म किंवा सोन्याच्या तुपाचं सेवन का आहे फायद्याचं? आयुर्वेदिक तज्ज्ञांनी सांगितलं खरं तूप कसं ओळखायचं?

बाजारात अनेक प्रकारचे तूप उपलब्ध आहे पण कधी तुम्ही सोन्याच्या तुपाविषयी ऐकलं आहे का? आयुर्वेद अभ्यासक डॉ. दिक्षा भावसार सावलिया यांनी इंडियन एक्सस्प्रेसशी बोलताना २४ - कॅरेट सोन्याने बनवलेल्या विशेष तुपाचे शरीरासाठीचे फायदे सांगितले आहेत. डॉ. दीक्षा सांगतात की, हे तूप बिलोना पद्धतीने गीर-गाईच्या दुधाने बनवले जाते; आपण त्याला श्यामा म्हणतो (म्हणजेच जे श्यामाचे म्हणजेच कृष्णाचे आहे असे). भगवान श्रीकृष्णाचे गायींवर अतोनात प्रेम होते म्हणून या सोन्याने भरलेल्या तुपाचे नाव श्यामा असे ठेवण्यात आले आहे. आयुर्वेदानुसार, तूप 'योगवाहि' मानले जाते, याचा अर्थ त्यात औषधी गुणधर्म असतात अशातच त्यात सोन्याचे गुणधर्म जोडल्याने त्याची शक्ती द्विगुणित होऊ शकते. आता सोन्याचं तूप बनतं तरी कसं असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर हे तूप बनवताना यामध्ये २४ -कॅरेट सोन्याचे नाणे टाकले जाते. या नाण्याचा अंश तुपात उतरतो व त्यातून स्वर्ण भस्म तूप तयार होते. आता आपण या तुपाचे फायदे सुद्धा पाहुयात.



स्वर्ण भस्माचे फायदे काय? रोगप्रतिकारशक्ती सुधारते कर्करोगास प्रतिबंध घालण्यासाठी स्मरणशक्ती वाढते मूड आणि ऊर्जा पातळी सुधारते हार्मोनल समतोल राखण्यास मदत

शांत झोप त्वचा आणि केसाचा दर्जा सुधारतो पोषणाची कमतरता भरून निघते शक्ती आणि कामवासना सुधारते प्रजनन क्षमता वाढवते (स्त्री आणि पुरुष दोघांसाठी) जळजळ कमी करते क्षयरोग बरा होण्यास मदत होते मानसिक आरोग्य सुधारते

डॉ. भावसार यांनी सुचवले की जेवणात किंवा साधारण दिवसभरातील सेवनात आपण १० - ३० मिली तुपाचे सेवन करू शकता. गर्भधारणेचा प्रयत्न करणाऱ्या सर्व जोडप्यांना, गर्भवती महिलांना आणि हार्मोनल असंतुलन असलेल्या महिलांना याचा फायदा होऊ शकतो. याशिवाय तणाव, खराब मानसिक आरोग्य आणि आतड्यांसंबंधी समस्या असणाऱ्यांना सुद्धा हे तूप खाण्याचा फायदा होऊ शकतो.

स्वर्ण भस्म तुपाविषयी ग्लेनिगल्स हॉस्पिटल्स परळ, मुंबईच्या इंटरनल मेडिसिनच्या वरिष्ठ सल्लागार डॉक्टर मंजुषा अग्रवाल यांनी सांगितले की, ही पद्धत वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाली नसल्यामुळे त्याविषयी ठोस दावा करता येणार नाही. आयुर्वेद प्रशिक्षक डॉ डिंपल जांगडा यांनी सांगितले की, सोन्याने भरलेले तूप 'स्वर्ण भस्म' म्हणूनही ओळखले जाते. याला आयुर्वेदातील सुवर्ण द्रव म्हणून गौरवले जाते, याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. शरीराला सुदृढ ठेवण्यासाठी आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी ही प्राचीन आयुर्वेदिक रेसिपी फायदेशीर ठरू शकते. पारंपरिक पद्धतीने तूप कढवून पारंपारिक तंत्रांचा वापर करून सोन्यावर काळजीपूर्वक प्रक्रिया करून भस्म बनवावे लागते.

डॉ जांगडा यांच्या माहितीनुसार, स्वर्ण भस्माचे सेवन अश्वगंधासह केल्यास कामोत्तेजना मिळू शकते त्यामुळे लैंगिक आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. स्वर्ण भस्म दुधासह मिसळल्यास ताकद आणि प्रतिकारशक्ती सुधारण्यास मदत होते. डोळ्यांचे आरोग्य, मेंदूचे आरोग्य आणि स्मरणशक्तीसाठी सुद्धा याची मदत होऊ शकतो.

स्वर्ण भस्म शुद्ध आहे का कसे ओळखावं? पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'स्वर्ण भस्म' शुद्ध असणे आवश्यक आहे. हे ओळखण्यासाठी या टिप्स वापरू शकता. सर्वात आधी तुपात वापरलेले भस्म अत्यंत बारीक असले पाहिजे, त्यात चमक नसावी, कारण भस्म तयार केल्यावर त्याची चमक कमी होते. ते अपरिवर्तनीय देखील असले पाहिजे, म्हणजे भस्माचे रूपांतर धातूमध्येच होऊ शकत नाही. तूप पाण्यात मिसळल्यावर भस्म पाण्यावर तरंगला पाहिजे.

## राज्याच्या पर्यटन धोरणातून १८ लाख रोजगार निर्मिती होणार, गिरीश महाजन यांची माहिती

मुंबई : पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याचे पर्यटन धोरण - २०२४ तयार करण्यात आले आहे. या पर्यटन धोरणाद्वारे राज्यात राज्यात अंदाजे १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार निर्मिती करण्यात येणार आहे.यामध्ये १० वर्षात पर्यटनस्थळे तसेच पायाभूत सुविधा विकसित करुन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.ग्रामीण व शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात त्यासाठी उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करुन ग्रामीण भागातील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील लघु, मध्यम, मोठे, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब, क, गटांमध्ये विभागण्यात आले असून त्यांना गुंतवणूक व रोजगार निर्मितीच्या आधारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना व्याज परतावा, एसजीएसटी परतावा, विद्युत शुल्कासह विविध करांमध्ये सवलतींचा धोरणात समावेश आहे, असे गिरीश महाजन यांनी सांगितले.ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांसाठी होम स्टे, ग्रो टुरिझम या स्पर्धा विभागनिहाय राबविण्यात येणार आहेत. या धोरणामुळे राज्याचा देशातील राज्यांमध्ये अग्रेसर राज्य श्रेणीत समावेश होणार आहे. देशातील व राज्यातील पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यायाने व्यापार- उत्पन्न आणि उद्योजकता यांना चालना देणे, पर्यटन क्षेत्रामध्ये ग्रामीण व शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटन क्षेत्रात नवीन गुंतवणूक आणणे, राज्याच्या महसुलात वाढ करणे,अशा अनेक गोष्टींवर या धोरणात भर देण्यात येणार आहे.

याबाबतचा सविस्तर शासन निर्णय राज्य शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असेही महाजन यांनी म्हटले आहे.

# हरिजवळगा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप..

निलंगा / मिलिंद कांबळे :- मौजे हरिजवळगा ता. निलंगा जिल्हा लातूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅग वाटप करण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी की, इंडियन ऑयल कॉर्पोरेट च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपून येथील इयत्ता १ ली ते ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी गावातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्रीरंग हाडोळे,जेष्ठ संपादक मोहन क्षिरसागर शाळेचे मुख्याध्यापक कलबोने बी एस,पत्रकार मिलिंद कांबळे, ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक देशमुख, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर हाडोळे,उपाध्यक्ष






विनोद मुगळे यांच्यासह शाळेतील शिक्षक वृंद त्यात श्रीमती वाघमारे सी.पी ,श्रीमती कोकणे एम.आय,श्रीमती बेळकिरे ए.एच ,श्रीमती पतंगे आर. एच, श्रीमती नाटकरे एस.पी यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते...

## आम आदमी पार्टीने केली मनपाच्या कराच्या बिलांची होळी

लातूर : गेल्या अनेक महिन्यापासून महानगरपालिकेकडून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही तरीही लातूर महानगरपालिका सामान्य नागरिकांच्या खिशातून स्वच्छता कराची वसुली करत आहे. निवासी मालमत्तेस वर्षाला १२०० व बिगर निवासी मालमत्तेस वर्षाला २४०० रुपये स्वच्छता करापोटी मनपा वसूल करत आहे.

१५ दिवसांपूर्वी आम आदमी पार्टीने १५ दिवसात कचऱ्याचे व्यवस्थापन करा नाहीतर तुमच्या आवारात स्वच्छता बिलांची होळी करू असा इशारा मनपाला दिला होता.१५ दिवसानंतरही मनपाकडून कचऱ्याचे कुठलेही व्यवस्थापन होताना दिसत नाही म्हणून आम आदमी पार्टीने आज मनपा गेटसमोर स्वच्छता बिलांची होळी केली. यावेळी बोलताना आपचे जिल्हाध्यक्ष श्री. आश्विन सुभाषराव नलबले म्हणाले स्वच्छता करत नसेल तर मनपाला करवसुली करण्याचा कुठलाही अधिकार नाही. म्हणून आज आम्ही लातूरच्या नागरिकांनी मनपा स्वच्छता करेपर्यंत कुठलाही कर भरू नये असे जाहीर आवाहन करत आहोत.लातूर महानगरपालिका सर्वसामान्य नागरिकांचे खिशातून स्वच्छता कराची वसुली तर करत आहे पण कसल्याच प्रकारची सुविधा देत नाही.

## महिला बचतगटांच्या समूह साधन व्यक्ती गाव पातळीवर भरून घेणार मुख्यमंत्री- लाडकी बहीण योजनेचे अर्ज

### अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया होणार गतिमान

लातूर : - प्रत्येक पात्र महिलेला मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन मिशन मोडवर काम करीत आहे. या योजनेसाठी पात्र महिलांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी महिला बचतगटांच्या समूह साधन व्यक्ती (सीआरपी) यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे असून याबाबत त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत १९ हजार २८३ महिला बचतगट असून साधारणपणे २० बचतगटांसाठी एक समूह साधन व्यक्ती याप्रमाणे ९७४ इतक्या समूह साधन व्यक्ती कार्यरत आहेत. या सर्व समूह साधन व्यक्तींना 'नारीशक्ती दूत' मोबाईल पद्वारे मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी महिलांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील समूह साधन व्यक्ती प्राधान्याने जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत १९ हजार २८४ बचतगटातील पात्र महिला सदस्यांच्या ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया संबंधित गावातच पूर्ण करणार आहेत. या बचतगटांसोबत जिल्ह्यातील जवळपास १ लाख ८४ हजार कुटुंब जोडली गेलेली आहेत. तसेच इतरही पात्र महिलांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची कार्यवाही त्यांच्यामार्फत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पात्र महिलांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया गतिमान होण्यास



मदत होणार आहे. मोबाईल पद्वारे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी समूह साधन व्यक्ती यांना जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे जिल्हा व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांनी तालुकानिहाय मार्गदर्शन केले असून ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना केल्या आहेत.

## आषाढी एकादशी निमित्त विठुरायाचा पालखी सोहळा एमडीए फाऊंडेशनची कोळपा येथे दिंडी

### मोहर्रमनिमित्त डोल्याचे दर्शन घेत विद्यार्थ्यांना सामाजिक ऐक्याचे धडे

लातूर/प्रतिनिधी:कोळपा येथील एमडीए शैक्षणिक संकुलाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त विठूरायाचा पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. गावातील विठ्ठल मंदिरापर्यंत दिंडी काढण्यात आली.

मोहर्रम निमित्त स्थापन करण्यात आलेल्या डोल्याचे दर्शन घेत संस्थेकडून विद्यार्थ्यांना सामाजिक एकोप्याची शिकवण देण्यात आली.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होते.






भजन व नृत्य सादर करीत विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्याचा आनंद द्विगुणित केला. प्रारंभी संस्था संचालक दिनेश आंबेकर यांनी विठुरायाची व पालखीची पूजा केली.या कार्यक्रमास संस्थेच्या शाळा विभाग प्रमुख,मुख्याध्यापिका श्रीमती वाडी मॅडम, फार्मसी विभाग प्रमुख कुऱ्हाडे सर,उच्च शिक्षण विभागाचे प्रमुख कदम सर,पडवळ सर,सुगरे सर यांच्यासह अनेक पालक व कर्मचारी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. एमडीए शैक्षणिक संकुल ते गावभागातील विठ्ठल रखुमाई मंदिर या मार्गे दिंडी काढण्यात आली. पालखी सोहळा गाव भागात दाखल होताच जेष्ठ नागरिकांसह सरपंच सिद्धेश्वर श्रीगिरे,गोविंद आंबेकर,शिवाजी खराबे,हनुमंत श्रीगिरे, कार्तिक स्वामी,लाला खराबे,इब्राहीम शेख,सुरेश केवळराम यांनी पालखीचे स्वागत केले.

गाव भागात मोहर्रम सणानिमित्त स्थापन करण्यात आलेल्या डोल्याचे संस्था संचालक,अधिकारी, कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी दर्शन घेत मनोभावे पूजा केली. या माध्यमातून संस्थेने सामाजिक ऐक्य जपण्याची शिकवण विद्यार्थ्यांना दिली.

पालखी सोहळा मंदिरात दाखल होताच माता-भगिनींनी पालखी सोहळा पाहण्यास गर्दी केली.यावेळी विठ्ठल रखुमाईची पुजा एमडीए परिवाराच्या मुख्य श्रीमती प्रेमा मनोहरराव आंबेकर व सौ.परियंता आंबेकर यांच्या हस्ते करण्यात आली.शिक्षक व शिक्षिकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात पाऊले खेळत आनंदोत्सव साजरा केला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना उपस्थितांच्या हस्ते ५०० वृक्षांचे वाटप करण्यात आले.सर्व प्रमुख पाहुणे व उपस्थित पालकांचे संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) तालुका देवणी च्या वतीने तीव्र निदर्शने व धरणे आंदोलन!

देवणी / प्रतिनिधी :- दि १८/०७/ २०२४ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले तालुका देवणीच्या वतीने देवणी तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने व धरणे आंदोलन करण्यात आले, सचिन सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी या प्रमुख मागणी सह विविध मागण्या संदर्भात आज देवणी तहसीलदार मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांना निवेदन देण्यात आले यावेळी मयत सचिन सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील आई-वडील,भाऊ,त्यांची पत्नी व मुले उपस्थित होते,सदरील आंदोलनाचे नेतृत्व रिपाई राज्य सचिव चंद्रकांत चिकटे, मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे,जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब कांबळे,जिल्हा उपाध्यक्ष अंकुश ढेरे,देवणी तालुका अध्यक्ष गणेशभाऊ कांबळे दवणहिप्परगेकर यांनी केले,यावेळी रिपाई नेते अशोक कांबळे,सुनील वहावळे, युवक जिल्हा अध्यक्ष सुशील कुमार शिंदे,शिरूर अनंपाळ तालुका अध्यक्ष मधुकर कांबळे,निलंगा तालुका अध्यक्ष संदीप कांबळे, उदगीर तालुका अध्यक्ष प्रफुल्ल कुमार उदगीरकर, चाकूर तालुका अध्यक्ष पपन कांबळे,देवणी तालुका




उपाध्यक्ष,बालाजी सोनवणे वलांडीकर,लहू ढेरे निलंगेकर,राजू कांबळे,गंगाधर जिरे, गुणवंत कांबळे,विठ्ठल गायकवाड,उत्तम रणदिवे, भीमदर्शन बोरे,रोहित डोंगरे,ज्ञानेश्वर सूर्यवंशी सह संपूर्ण जिल्हा व तालुक्यातील रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते,सचिन सूर्यवंशी यांच्या मारेकर्याला तात्काळ अटक झाली नाही तर येणाऱ्या काळामध्ये पक्षाच्या वतीने यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

## सराफ महाविद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त किर्तन संपन्न

मुंबई (प्रतिनिधी): मालाड येथील घनश्यामदास सराफ महाविद्यालय येथे आषाढी एकादशी निमित्त मराठी वाङ्मय मंडळातर्फे दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला. परंपरेनुसार विठ्ठल रखुमाईची मूर्ती शिरावर धारण करून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आवारात पंढरपूरच्या वारीचा सोहळा उभारला. विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीची स्थापना करून आरती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विठ्ठलावर अभंग, कविता आणि निबंध सादर केले. शिक्षकांनी देखील विठ्ठलावर भक्ती गीते सादर केली. किर्तनकार ह. भ.प. सौ. मधुरा प्रभु अनारेडी यांनी प्रमुख अतिथीपद भूषविले आणि आपल्या सुमधुर स्वरात देवशयनी



आषाढी एकादशी विषयावर आधारित किर्तन सादर केले. त्यांनी संत एकनाथ यांचा अभंग 'देवा माझे मन लागो तुझे चरणी... पूर्व रंगात प्रस्तुत केला आणि गोमाई आजीच्या वारीचे आख्यान उत्तर रंगात सादर केले. शिक्षक आणि विद्यार्थी श्रोतेगण दिंडी व किर्तन सोहळ्यात मंत्रमुग्ध झाले. मराठी वाङ्मय मंडळाचे संचालक डॉ. अनिल धीमधीमे, सदस्य प्रा. रामकृष्ण शिखरे आणि सदस्य प्रा. प्रसाद अनारेडी यांनी महाविद्यालयाचे शिक्षण संचालक सीए डॉ. जयंत आपटे, प्राचार्य डॉ. अश्वत देसाई, उपप्राचार्य सीए गुरुनाथन पिल्ल, उप-प्राचार्या डॉ. सीमा अगरवाल, उप-प्राचार्या डॉ. लिपी मुखर्जी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## लातूर अर्बन ,को ऑफ बँक व अष्टविनायक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने लहान मुलांसाठी दिंडी व डान्सची स्पर्धा आयोजित

लातूर :- लातूर अर्बन ,को ऑफ बँक व अष्टविनायक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर अर्बन बँकेचे चेअरमन प्रदीप राठी यांनी १७ जुलै आषाढी एकादशी निमित्त लहान मुलांसाठी दिंडी व डान्सची स्पर्धा आयोजित केली. यामध्ये फुलोरा विद्यालय ,लातूर सहा ते दहा वयोगट या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. व स्वतःच्या सुप्त गुणांनी अनुक्रमे तीन पारितोषिके मिळविली. त्यात इयत्ता चौथी वर्गातील कु. प्रगती नरवडे हिला पोशाख व नृत्य याचे प्रथम पारितोषिक मिळाले. व इयत्ता चौथी वर्गातील कु. आरोही सूर्यवंशी हिला चेहऱ्यावरील हावभाव ,उत्तम नृत्य याचे प्रथम पारितोषिक १००० रुपयाची बहुमान देऊन गौरविण्यात आले. नृत्य स्पर्धेमध्ये फुलोरा विद्यालयाचा, प्रथम क्रमांक आल्याबद्दल प्रथम पारितोषिक, देऊन गौरविण्यात आले.



तर इयत्ता चौथी वर्गातील, मुलांचा समूह नृत्यमध्ये उत्तम कोऑर्डिनेशन म्हणजेच एकसूत्रीकरण, यासाठी १००० रुपयाचा चेक देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ . रोहिणी सावंत मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना, प्रोत्साहन दिले, व त्यांच्या कलागुणांना वाव दिला.. त्याचबरोबर शाळेतील कर्मचारी स्टाफ अलका बिराजदार मॅडम, शेख फरान मॅडम, रोहिणी मलंग मॅडम, मोरेश्वर मोरे सर, शुभम सर व सहभागी पालक व विद्यार्थी उपस्थित होते. फुलोरा विद्यालयाचे ,अध्यक्ष श्रीमान आदरणीय गजानन गोंधळी सर, व फुलोरा विद्यालयाचे सचिव श्रीमान आदरणीय यशपाल कांबळे सर दुसऱ्या दिवशी सकाळी प्रार्थनेच्या वेळी यांनी मुलांचे कौतुक केले व योग्य मार्गदर्शन दिले ..

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आण्णाभाऊ साठे चौकात केले अभिवादन

लातूर - महामानव साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज १८ जुलै रोजी सकाळी १० वाजता लातूर शहरातील अण्णाभाऊ साठे चौकातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राज क्षीरसागर, आनंदभाई वैरागे, जी. ए. गायकवाड, मोहन सुरवसे, माजी सभापती टी एन कांबळे, सचिनद्र कांबळे, केशरबाई महापुरे, संभाजी मस्के, वर्षा मस्के, सुनील बसपुरे, राजेंद्र लोदगेकर, विश्वजीत गव्हाणे, नूतन हनमंते, लक्ष्मण मस्के,ॲड. अंगद गायकवाड, नवगिरे ताई, बबीता रणदिवे, मयूर



बनसोडे, डॉ. फत्तेपूरकर, दशरथ गोणे, बालाजी कलवले, योगेश पवार, माजी समाज कल्याण सभापती गायकवाड, उत्तम माने, नागनाथ कांबळे, उत्तम कसबे, संभाजी गव्हाणे,पिराजी साठे, रवी अर्जुन, रघुवीर लोंढे नवनाथ डोंगरे, संजय वेरुळे आदिसह समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE